# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७००/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/१०/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २२/१०/२०१६ रोजी ०९.०० वा. ते २३/१०/२०१६ रोजी ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी योगेश निकलाल गि–हेपुंजे वय ३० वर्ष, रा. मोहाडी याने आपली हिरो होन्डा पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३५ एक्स ७९७५ कि. २५,०००/–रु. ही आपल्या श्रानेश्वरी मल्टी स्पेशालीटी दवाखाना मोहाडी समोर ऊभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीमुळे बोलेरो गाडीला धडक, दोन जखमी . :–**

दिनांक २३/१०/२०१६ रोजी १८.३० वा. दर. यातील फिर्यादी हा नागपुर येथे गोवारी समाजाचा अधिवेशन पार पाडुन आपल्या गावी देवनारा येथे बोलेरो गाडी क्र. एमएच ४० एसी ०७५१ ने जात असता युवराज बार मोहाडी जवळ मागेहुन येणा–या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने, निष्काळजीपने, भरधाव वेगाने चालवुन बोलेरो गाडीस मागेहुन धडक मारुन गाडीत बसलेले शिवदास कोहळे वय २९ वर्ष, विजय घोनोळ वय २३ वर्ष, व इतर २ इसमांना सर्व रा. देवनारा जखमी केले व गाडीचे नुकसान करुन पळुन गेल्याने असे फिर्यादी रामेश्वर श्रीराम नेवारे वय ३० वर्ष, रा. यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या निष्काळजीमुळे, दोन जखमी. :–**

दिनांक २३/१०/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी रामेश्वर ताराचंद बान्ते वय ५२ वर्ष, रा. बोथली हे बोथली गावाचे पानठेल्यावर बसले असता यातील ट्रक क्र. एमएच ४९/१०२६ च्या आरोपी च्या चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन पानठेल्यावर बसलेले आचल प्रभुजी कुकडे वय २६ वर्ष, विठ्ठल आकडुजी बाभरे वय ६२ वर्ष, दोन्ही रा. बोथली यांना साधी व गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने व जवळ ऊभ्या असलेल्या मोटार सायकल व सायकलीच्या नुकसानीस कारणीभुत झाल्याने फिर्यादी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) ऑटो चालकांच्या निष्काळजीपने महीलेस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २३/१०/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादीची सुन जखमी सौ. शारदा सुभाष खंगार वय ३० वर्ष, रा. गराडा बु. ही बाजार करुन यातील आरोपीचे ऑटोने गावी परत जात असतांना एनएच ०६ रोडवर अशोका बार समोर ऑटो चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने चालवुन अचानक ब्रेक मारल्याने जखमी ही ऑटो मधुन खाली पडल्याने तीचे डोक्यावर, चेह–यावर मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७, भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक २३/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. आंधळगांव येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन १४६ लिटर ८८० मिली देशी + मारुती कि. १,३४,०००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.